**(CNR No.:-MHSO-1900-0258-2026)**
*(हणमंत शिंदे वि. प्रशांत सुतार व इतर)*

## नि.०५ वरील आदेश
## (पारीत दिनांक २९/०५/२०२६)

प्रस्तुतचा अर्ज वादीने प्रतिवादी यांचे विरुद्ध अंतरीम मनाई हुकूम मिळण्याकरीता दाखल केलला आहे.

०२. वादीचे कथन असे की, मोहोळ येथील मा.तहसिलदार यांच्या न्यायालयात आर.टी.एस./फेरचौकशी/एसआर/०३/२०२४ व आर.टी.एस./फेरचौकशी/एसआर/०४ २०२४ निकाल तारीख १०/११/२०२५ या आदेशांचा आधार घेऊन प्रतिवादी क्र.१ ते २इ हे वादी यांना दावा कलम २अ ते २क या मिळकतीमध्ये वहिवाटण्यास व उपभोगण्यास हरकत अडथळा करत आहेत. तसेच वादींच्या दावा कलम २अ ते २क या शेतजमीनीमध्ये नवीन रस्ता तयार करण्याचा प्रयत्न प्रतिवादी करत आहे. दावा मिळकतीमध्ये सध्या उभी पिके आहेत. प्रतिवादी क्र.१ ते २इ यांनी केलेल्या हरकत, अडथळ्यामुळे वादीच्या पिकांचे नुकसान होत असून प्रतिवादी हे वादींनी समजावून सांगितले असता काहीही ऐकण्याच्या मनस्थितीत नाही. वर नमुद दोन्ही फेरचौकशी प्रकरणातील आदेश वादीने या न्यायालयात आव्हानीत केलेले आहे. दाव्यातील कथने, अभिलेखावर दाखल केलेली कागदपत्रे व तुर्तातुर्त ताकीद अर्जातील कथने यावरुन न्यायाचा समतोल वादीच्या बाजुने आहे. तुर्तातुर्त ताकीद अर्जावरील आदेश वादीच्या हक्कात न झाल्यास वादीचे अपरिमित नुकसान होणार आहे. याउलट प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. सबब, वादीचा तुर्तातुर्त ताकीद अर्ज मंजूर करण्यात यावा अशी विनंती वादीने केली आहे.

०३. प्रतिवादीने वादीचे प्रस्तुत अर्जास निशाणी क्र.१८ वर म्हणणे दाखल केले. प्रतिवादीने वादीच्या अर्जातील संपुर्ण कथने मान्य व कबूल नसल्याचे कथन केले आहे. प्रतिवादीच्या कथनानुसार तहसिलदार, मोहोळ यांच्याकडे फेरचौकशी नंतर प्रकरणे आले होते व त्यानुसार वादी व प्रतिवादी यांना पुर्ण संधी देऊन सर्व कागदपत्रे पाहून तहसिलदार, मोहोळ यांनी आदेश पारीत केलेला आहे. सदर आदेशाची कायदेशीर अंमलबजावणी होणे योग्य व

न्यायोचित आहे परंतु वादीने न्यायालयाची दिशाभूल करुन प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे. वादीचा अर्ज मंजूर झाल्यास प्रतिवादीचे कधीही भरुन न येणारे नुकसान होणार आहे. त्यामुळे वादीचा अर्ज नामंजूर करण्यात यावा अशी विनंती प्रतिवादींनी केली आहे.

०४. अर्ज व म्हणणे यावरुन खालील मुद्दे माझे विचारार्थ निघतात, त्यावरील निष्कर्ष कारणमीमांसेसह खालीलप्रमाणे नोंदविले आहेत.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादीच्या लाभात सकृतदर्शनी केस आहे काय ? | होकारार्थी... |
| २. | न्यायाचा तौलनिक कल वादीच्या लाभात असल्याचे वादीने सिध्द केले आहे काय ? | होकारार्थी... |
| ३. | मनाई हुकुम न दिल्यास वादीचे पैशाने न भरुन येणारे अपरिमित असे नुकसान होईल हे वादीने सिध्द केले आहे काय ? | होकारार्थी... |
| ४. | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## <u>कारणमीमांसा</u>

०५. वादीने त्याच्या कथनापुष्ट्यर्थ निशाणी क्र.०४, २७, २९ वर खालील प्रमाणे कागदपत्रे दाखल केली आहेतः–

१) तहसिलदार, मोहोळ यांच्याकडे प्रतिवादींना केलेला अर्ज

२) रस्ता केस एसआर/०८/२०१८ मधील नोटीसांची प्रत.

३) तहसिलदार, मोहोळ यांनी केलेला स्थळपाहणी पंचनामा व नकाशा.

४) रस्ता केस एसआर/०९/२०१८ मधील वादीचा हरकत अर्ज.

५) रस्ता केस एसआर/०९/२०१९ स्थळपाहणी नंतर वादीने दिलेले म्हणणे.

६) रस्ता केस एसआर/०९/२०१८ मधील लेखी युक्तिवाद.

७) रस्ता केस एसआर/०८/२०१८ व एसआर/०९/२०१८ मधील एकत्रीत

निकालाची प्रत.

८) आर.टी.एस.रिव्हीजन अर्ज क्र.२०३४/२०२१ मधील निकालाची प्रत.

९) तहसिलदार, मोहोळ यांचेकडील फेरचौकशी अर्ज एसआर/०३/२०२४ मधील निकालाची प्रत.

१०) तहसिलदार, मोहोळ यांचेकडील फेरचौकशी अर्ज एसआर/०४/२०२४ मधील निकालाची प्रत.

११) वादी व प्रतिवादी यांचा शेतजमीनीचा ७/१२ उतारा.

१२) नोंदणीकृत साठेखत दस्त क्र.१५२१७, १५२२३, १५२१४ याच्या झेरॉक्स प्रती.

१३) वादी यांच्या लाभात नोंदणीकृत खरेदीखत दस्त क्र.६०२९, ६०३०, ६०३१, दि.०५/१२/२०२२ रोजीच्या झेरॉक्स प्रती.

१४) मौजे औंढी, ता.मोहोळ येथील गाव नकाशाची प्रत.

१५) नोंदणीकृत खरेदीदस्त क्र.४५२३/२०१२ ची प्रत.

०६. प्रतिवादी यांनी त्यांच्या कथनापुष्ट्यर्थ निशाणी क्र.२०, ३२ वर खालीलप्रमाणे कागदपत्रे दाखल केली आहे.

१) पोलीस अधिक्षक यांचेकडील दि.०९/१२/२०२५ रोजीचा अर्ज.

२) पोलीस निरीक्षक, मोहोळ पोलीस स्टेशन यांचेकडील दि.०९/१२/२०२५ रोजीचा तक्रारी अर्ज.

३) दि.२२/१२/२०२५ रोजीचा तक्रारी अर्ज.

४) दि.१५/०१/२०२६ रोजी वादी विरुध्द तहसिलदार, मोहोळ यांचेकडे दिलेला तक्रारी अर्ज.

५) दि.०५/०२/२०२६ रोजी वादी विरुध्द तहसलिदार, मोहोळ यांचेकडे दिलेला तक्रारी अर्ज.

६) दि.११/०२/२०२६ रोजी तहसिलदार, मोहोळ यांनी पोलीस निरीक्षक, मोहोळ यांना दिलेला आदेश.

७) प्रतिवादींनी तहसिलदार, मोहोळ यांच्याकडील प्रकरणात दाखल केलेला कच्चा

नकाशा.

८) गट क्र.१२४/१ चा उतारा.

९) गट क्र.१२४/२ चा उतारा.

१०) गट क्र.१२६/१, १२६/२, १२६/३, १२६/४ चा उतारा.

०७. अर्जातील कथन व वादी व प्रतिवादी यांचे वकीलांचा युक्तिवाद ऐकला. प्रस्तुत अर्जामधील दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले.

**<u>मुद्दा क्र.१ ते ४ बाबत</u> –**

(वरील सर्व मुद्दे एकमेकांशी संलग्न असल्यामुळे विवेचनाची पुनरावृत्ती टाळण्यासाठी त्यांचे विवेचन एकत्र केलेले आहे)

०८. तुर्तातुर्त मनाई हुकुम ही एक समन्वयीक दाद आहे. वादीला मनाई हुकूम मिळण्यासाठी सकृतदर्शनी केस, न्यायाचा समतोल व अपरिमित नुकसान या बाबी प्रथमदर्शनी शाबीत करणे आवश्यक आहे. प्रस्तुतचा मुळ दावा वादीने प्रतिवादीविरुध्द तहसिलदार यांचे न्यायालयातील आरटीएस/फेरचौकशी/एसआर/०३/२०२४ व आरटीएस/फेरचौकशी/एसआर/०४/२०२४ या आदेशांच्या आधारे वादींना दावा कलम २अ ते २क मध्ये नमुद मिळकती वहिवाटण्यास व उपभोगण्यास स्वतः अगर इतरांमार्फत म्हणजेच ति–हाईत, नाकरचाकर, नातेवाईक यांच्यामार्फत कोणताही हरकत, अडथळा करु नये अशी निरंतर मनाई मिळणेकरीता दाखल केला आहे. प्रस्तुत तुर्तातुर्त मनाई अर्जाव्दारे वादीने दावा प्रलंबित असताना तहसिलदार यांचे न्यायालयातील आरटीएस/फेरचौकशी/एसआर/०३/२०२४ व आरटीएस/फेरचौकशी/ एसआर/०४/२०२४ या आदेशांच्या आधारे वादींना दावा कलम २अ ते २क मध्ये नमुद मिळकती वहिवाटण्यास व उपभोगण्यास स्वतः अगर इतरांमार्फत म्हणजेच ति–हाईत, नाकरचाकर, नातेवाईक यांच्यामार्फत कोणताही हरकत, अडथळा करु नये अशी तुर्तातुर्त ताकीद देण्यात यावी याकरिता केलेला आहे. वादीच्या कथनावरुन, अभिलेखावरुन व उपलब्ध कागदपत्रांवरुन वादीने प्रतिवादीविरुध्द तुर्तातुर्त मनाई हुकूम

मिळण्यासाठी समर्थनीय पुराव्याआधारे सकृतदर्शनी केस सिध्द केली आहे काय हे पाहणे आवश्यक आहे.

०९. वादीच्या कथनाप्रमाणे, प्रतिवादी यांनी दि.०३/०३/२०१८ रोजी तहसिलदार, मोहोळ यांचेकडे अर्ज दाखल करुन गट क्र.१३०/१/ड मधुन पुर्व–उत्तर कोप–यातून उत्तरेकडे पुळुज ते औंढी या गाव रस्त्यास जाणे–येणे करीता प्रस्तुत अर्जातील वादी यांचे गट क्र.१३०/२/अ, ब व क या मिळकतींच्या पुर्व–उत्तर कोप–यास पुर्वीपासून वापरात व वहिवाटीस असलेल्या रस्त्यास हरकत, अडथळा करु नये म्हणुन निरंतर ताकीद प्रस्तुत वादीविरुध्द मिळणेकरीता केलेला होता. सदर अर्ज गजेंद्र ज्ञानदेव शिंदे यांच्याविरुध्द दाखल केलेला होता. परंतु, वादीची प्रत्यक्ष कब्जेवहिवाट दावा मिळकतीमध्ये असताना दिशाभूल करुन आदेश मिळवण्याकरीता प्रतिवादींनी केवळ गजेंद्र शिंदे यांच्याविरुध्द अर्ज दाखल केला. याठिकाणी प्रतिवादींतर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अर्ज दाखल करताना ७/१२ उता–यावर गजेंद्र शिंदे यांचे नाव असल्याने व अर्ज दाखल झाल्यानंतर वादीच्या लाभात खरेदीखत झाल्याने केवळ गजेंद्र शिंदे यांच्याविरुध्द मुळ अर्ज दाखल केला होता. अभिलेखावरील दाखल कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, वादी यास सदर तहसिलदार यांचेकडील प्रकरणामध्ये हरकत अर्ज देऊन त्याप्रमाणे वादी पक्षकार म्हणुन सामील झाल्यानंतर दोन्ही बाजुंना पुराव्याची संधी देऊन दि.०६/०७/२०२१ रोजी तहसिलदार यांनी प्रतिवादींचा अर्ज नामंजूर केलेला आहे. सदर आदेश उपविभागीय अधिकारी, पंढरपूर यांचेकडे रिव्हीजन अर्ज क्र.२३४/२०२१ अन्वये प्रतिवादीनी आव्हानीत केला व सदर अर्जावरील आदेशानुसार सदर अर्ज मंजूर होऊन आर.टी.एस./कलम५/एसआर/८,९/२०१८, दि.०६/०७/२०२१ रोजीचा आदेश रद्द करण्यात आला व प्रकरण फेरचौकशी करुन गुणवत्तेवर आदेश पारीत होण्याकरीता तहसिलदार, मोहोळ यांचेकडे पाठवण्यात आले.

१०. त्याप्रमाणे फेरचौकशी अर्ज क्र.आरटीएस/फेरचौकशी/एसआर/०३/२०२४ व आरटीएस/फेरचौकशी/ एसआर/०४/२०२४ दाखल झाले. सदर दोन्ही अर्ज दि.१०/११/२०२५ रोजी निकाली करण्यात येऊन फेरचौकशी अर्ज मान्य करण्यात आले व त्यानुसार शेतजमीन गट क्र.१३०/१/क मधुन पुर्व–उत्तर कोप–यातून पुळुज ते औंढी रस्त्यास

जाणे–येणेसाठी प्रतिवादी यांचा गट क्र.१३०/२/अ, १३०/२/ब व १३०/२/क चा पुर्व–उत्तर कोप–यात वापरात असलेला गाडी रस्ता मंजूर करण्यात आला व प्रस्तुत दाव्यातील वादीने प्रतिवादींना हरकत, अडथळा करु नये असे आदेशीत करण्यात आले आहे.

११. फेरचौकशी आदेश करतेवेळी उपविभागीय अधिकारी, पंढरपूर यांनी त्यांच्या आदेशामध्ये मुद्दा क्र.६ मध्ये निष्कर्ष या मुद्दयामध्ये अ.क्र.३ येथे अर्जदार यांनी मागणी केलेल्या रस्त्यावर विहीर असल्याचे नमुद आहे तथापी पुर्वापार वहिवाटीचा रस्ता असल्याबाबत तहसिलदार, मोहोळ यांनी खातरजमा केलेली नाही. कारण विहीर खरी असली तरी पुर्वापार रस्ता कमी अधिक रुंदीचा असू शकतो त्यामुळे सदर बाबत तहसिलदार, मोहोळ यांनी फेरचौकशी करुन निर्णय पारीत करणे आवश्यक असल्याचे मत नोंदवले आहे. यावरुन फेरचौकशी वेळी पुन्हा सर्व प्रक्रिया म्हणजेच स्थळपाहणी, पंचनामा या सर्व बाबी होणे याठिकाणी अपेक्षीत आहे. परंतु, आरटीएस/फेरचौकशी/एसआर/०३/२०२४ व आरटीएस/फेरचौकशी / एसआर/०४/२०२४ फेरचौकशी आदेशाचे अवलोकन केले असता दि.१७/०९/२०१९ रोजी झालेला स्थळपाहणी पंचनाम्यावर अवलंबून राहून तहसिलदार, मोहोळ यांनी फेरचौकशी आदेश पारीत केल्याचे दिसून येते. वादींनी तहसिलदार, मोहोळ यांचेकडील प्रकरणामध्ये प्रतिवादीस पुळुज ते औंढी रस्त्यास जाण्याकरीता रस्ता उपलब्ध असल्याचे सांगून मागणी केलेला रस्ता कधीही अस्तित्वात नव्हता असे कथन केले आहे. त्यामुळे स्थळपाहणी व पंचनामा याबाबत योग्य तो निष्कर्ष तपासणे आवश्यक असताना तहसिलदार, मोहोळ यांनी फेरचौकशीमध्ये मागील स्थळपाहणी व पंचनाम्यावर विसंबुन राहून आदेश पारीत केल्याचे दिसून येते. मामलतदार कायदा कलम ५ नुसार पुर्वापार अस्तित्वात असलेल्या रस्त्याबाबतचे आदेश करण्याचे तहसिलदार यांना अधिकार असतात. परंतु, प्रस्तुत प्रकरणामध्ये त्याबाबतची कोणतीही शहानिशा झाल्याचे सकृतदर्शनी दिसून येत नाही. त्यामुळे वादीच्या मागणीमध्ये निश्चितच तथ्य आढळून येते. या कारणाने वादीच्या लाभात सकृतदर्शनी केस दिसून येते. न्यायाचा समतोलही वादीच्या बाजुने दिसून येतो. प्रस्तुतचा अर्ज नामंजूर झाल्यास वादीचे अपरिमित नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही. सबब, वादीचा अर्ज मंजूर करणे न्यायोचित ठरते. सबब, मुद्दा क्र.१ ते ३ चे निष्कर्ष होकारार्थी नोंदवून मुद्दा क्र.४ च्या उत्तरादाखल खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहेः–

## आ दे श

१. अर्ज **(निशाणी क्र.०५)** मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र.१ ते २इ यांनी तहसिलदार, मोहोळ यांचेकडील आरटीएस/फेरचौकशी/एसआर/०३/२०२४ व आरटीएस/फेरचौकशी/एसआर/०४/२०२४ आदेशानुसार वादीच्या दावा कलम २अ ते २क मधील मिळकती वहिवाटण्यास व उपभोगण्यास स्वतः अगर इतरांमार्फत म्हणजेच ति–हाईत, नोकरचाकर, नातेवाईक यांच्यामार्फत कोणताही हरकत, अडथळा वादीस करु नये अशी तुर्तातुर्त ताकीद प्रतिवादी क्र.१ ते २इ यांना देण्यात येते.

३. खर्चाबाबत काहीही आदेश नाही.

PALLAVI SHESHAGIRI GOVEKAR
Digitally signed by PALLAVI SHESHAGIRI GOVEKAR
Date: 2026.05.29 17:40:28 +0200

**(श्रीमती पी.एस.गोवेकर)**

दिनांक २९.०५.२०२६ दिवाणी न्यायाधीश क. स्तर, मोहोळ.

## C E R T I F I C A T E

I affirm that, the contents of this PDF file of Order/Judgment are same word to word as per the original Order/Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | A.S. Bakale |
| Court | : | Civil Judge Jr. Division, Mohol. |
| Date | : | 29/05/2026 |
| Judgment signed by the Presiding Officer | : | 29/05/2026 |
| Judgment Uploaded on | : | 29/05/2026 |